# जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद भंडारा अनुसूचित जमाती विशेष पद भरती सन २०१९

## उमेदवारांकरीता जाहिर सुचना

जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत विशेष पद भरती प्रक्रिया २०१९ अन्वये **"अंगणवाडी पर्यवेक्षिका"** या पदासाठी लाल बहादुर शास्त्री विद्यालय, भंडारा या परिक्षा केंद्रावर व **"कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)"** या पदासाठी जकातदार कन्या विद्यालय भंडारा या परिक्षा केंद्रावर दिनांक १२ जानेवारी २०२० रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली होती.

दिनांक १४ जानेवारी २०२० रोजी सदर लेखी परिक्षेचे पेपर तपासणी दरम्यान उत्तर तपासणी करतांना उत्तर पत्रिका तपासणी यंत्रणेमार्फत उत्तर पत्रिका तपासण्यात काही गैरप्रकार झाला. त्यामुळे सदर दोन्ही पदांकरीता दिनांक १२ जानेवारी २०२० रोजी झालेली लेखी परिक्षा जिल्हा निवड समिती, भंडारा यांचे दिनांक १५ जानेवारी २०२० ला झालेल्या निर्णयानुसार रद्द करण्यात येत आहे.

पुढील परिक्षा दिनांक व वेळ लवकरच www.bhandarazp.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना याबाबत वेगळयाप्रकारे कळविण्यात येणार नाही. तसेच लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांचे आसन क्रमांक व परिक्षा केंद्र यापुर्वी जे होते तेच राहतील. त्यासाठी नविन प्रवेशपत्र पुरविण्यात येणार नाही. याबाबत लेखी परिक्षेकरिता पात्र असलेल्या सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

स्वाक्षरी/-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी,
भंडारा

Scanned by CamScanner